# प्रादेशिक इतिहास

**प्रा. डॉ. दीपक पां. लोणकर**

*लोकमान्य महाविद्यालय, वरोरा, जि. चंद्रपूर (महा.), पिन. ४४२९०७*

*मो. नं. ९६५७३३६९१४ Email - deepakmd.lonkar@gmail.com*

**प्रस्तावना:—**

प्रादेशिक इतिहास ही इतिहासाची एक नविन शाखा असून बऱ्याचवेळा आपल्या जगाचा, खंडाचा, देशाचा इतिहास माहित असतो परंतु आपल्या सभोवताली असलेल्या परीसराचा, प्रदेशाचा इतिहास माहित नसतो त्या दृष्टीने प्रादेशिक इतिहासाची लेखन आवश्यक मानले जाते.

प्रामुख्याने १९५० नंतर या प्रादेशिक इतिहास लेखनाला सुरवात झाली. त्यामुळे आधुनिक काळात प्रादेशिक इतिहास लेखनाचे महत्व वाढले परंतु खेदाची गोष्ट अशी की राष्ट्रीय इतिहास लिहिला जातो परंतु प्रादेशिक इतिहासाबद्दल अजूनही उदासिनता दिसुन येते. १९७६ साली इतिहासकार रोमीला थापर यांनी पंजाबमध्ये झालेल्या इतिहास परिषदेतील व्याख्यानात प्रादेशिक इतिहासाची व्याप्ती व महत्व याबद्दल चर्चा केली होती.[१] त्यामुळे काही प्रमाणात भारतात प्रादेशिक इतिहासाच्या संशोधनाबद्दल पुढील काळात जागरूकता निर्माण झाली होती. परंतु पाहिजे तसे लिखान या संदर्भात झाले नाही. काही प्रमाणात या संदर्भात लेखन झाले त्यात जेम्स टॉड चा राजस्थानचा इतिहास, विल्यम हंटरचा ग्रामीण बंगालचा इतिहास, डब्लू एच मोरलंडचा संयुक्त प्रांताचा इतिहास, ग्रँड डफ चा मराठ्यांचा इतिहास, डॉ. रा. गो. भांडारकर यांचा दख्खनचा इतिहास, या. मा. काळे यांचा नागपूर प्रांताचा इतिहास, वि गो खोबरेकर यांचा कोकणचा इतिहास, अ. ज. राजूरकर यांचा चंद्रपूरचा इतिहास ही काही उदाहरणे देता येईल.

**उद्दीष्ट्ये:—**

(१) प्रादेशिक इतिहासाचे महत्व जाणून घेणे.

(२) प्रादेशिक इतिहासाची व्याप्ती समजून घेणे.

**गृहीतके:—**

(१) प्रादेशिक इतिहासामुळे राष्ट्रीय इतिहास समृध्द होतो.

**प्रादेशिक इतिहास हा अंशलक्षी इतिहास:—**

प्रादेशिक इतिहास ही संज्ञा लवचिक व सापेक्ष असून प्रादेशिक इतिहास कशाला म्हणावे याबद्दलच गैरसमज बरेच आहे. बरेचदा स्थानिक इतिहासालाच प्रादेशिक इतिहास म्हटले जाते. परंतु या दोन्ही भिन्न संकल्पना आहे. स्थानिक इतिहास हा प्रादेशिक इतिहासाचा सूक्ष्म प्रकार म्हणता येईल. या दृष्टीने विचार केल्यास भारत हे एकत्व मानल्यास द. भारत, उत्तर भारत, महाराष्ट्र, तामिळनाडू हे प्रादेशिक प्रकाशन मोडेल व महाराष्ट्र हे एकत्व मानले तर विदर्भ मराठवाडा, खानदेश, कोकण इत्यादी प्रदेश हा प्रादेशिक ठरेल. जर विदर्भाचा प्रदेश प्रादेशिक मानला तर नागपूर चा इतिहास, चंद्रपूरचा इतिहास हे स्थानिक ठरेल.[२] त्यामुळे जगाचा व राष्ट्राचा इतिहास हा समग्रलक्षी इतिहास (Macro History) आहे. तर प्रादेशिक व स्थानिक इतिहास हे अंशलक्षी इतिहास (Macro History) आहे.



Assistant Professor
Lokmanya Mahavidyalaya, Warora

Scanned with OKEN Scanner

**(३) प्रादेशिक प्रशासनाची माहिती उपलब्ध:—**

प्रादेशिक इतिहासलेखामुळे तेथील स्थानिक व प्रादेशिक प्रशासनाची माहिती उपलब्ध होऊन त्या प्रशासनाचे नियम, कायदे, निती, दंड या संदर्भातील बरीच माहिती उपलब्ध होऊ शकते. उदा. चंद्रपूर येथील गोंडाचे प्रशासन.[६]

**(४) प्रादेशिक इतिहासामुळे सांस्कृतीक माहिती उपलब्ध:—**

प्रादेशिक इतिहासाच्या लेखनामुळे त्या प्रदेशातील सामाजीक व सांस्कृतीक स्थिती याची माहिती उपलब्ध होते. तेथील प्रथा, परंपरा, सन, उत्सव, मनोरंजनाची साधने, खेळ, साहित्य, भाषा इत्यादी संदर्भात सांस्कृतीक माहिती उपलब्ध होऊन तेथील सामाजीक जीवनाची माहिती प्राप्त करून घेता येते.[७]

**(५) राजकीय स्थितीची माहिती:—**

प्रादेशिक इतिहासाच्या लेखनाद्वारे त्या विशिष्ट प्रदेशातील राजकीय व्यवस्था व स्थिती याचीही माहिती उपलब्ध होत. त्या प्रदेशातील राज्य, राज्यांची नावे, वंशावळी, त्यांच्या लढाया, प्रशासन, जय पराजय, तह इत्यादी संदर्भातील बरीच राजकीय माहिती मिळू शकते उदा. नागपूरच्या भोसल्यांचा इतिहास.[८]

**(६) प्रादेशिक नेतृत्वाची दखल:—**

प्रादेशिक इतिहासामुळे त्या प्रदेशातील स्थानिक व प्रादेशिक नेतृत्वाची माहिती मिळू शकते. बरेचदा रार्ष्ट्रीय इतिहास लिहितांना स्थानिक व प्रादेशिक नेतृत्वाची दखल घेतल्या जात नाही. त्याकडे दुर्लक्ष केल्या जाते. परंतु प्रादेशिक इतिहासात तेथील पुरूष व स्त्रि नेतृत्व त्यांचे कार्य, संस्था, संघटना यांची नोंद घेऊन त्या आधारे दुर्लक्षित नेतृत्वांना राष्ट्रीय इतिहासात समाविष्ट करून घेता येते या दृष्टीने प्रादेशिक इतिहासलेखनाला महत्व आहे. उदा. चंद्रपूर जिल्ह्यातील चिमूरच्या स्वातंत्र्यलढ्यांची माहिती व नेतृत्व यांचे अध्ययन फक्त अ. ज. राजूरकर यांच्या 'चंद्रपूरचा इतिहास' या प्रादेशिक ग्रंथात आहे.[९] राष्ट्रीय इतिहासात तेथील नेतृत्वाची नावे नाही यादृष्टीने प्रादेशिक इतिहासलेखनाला महत्व आहे.

**(७) कला व स्थापत्य:—**

प्रादेशिक इतिहास लेखनामुळे त्या प्रदेशातील कला व स्थापत्य यांची माहिती प्राप्त होते. विशेष त्या प्रदेशातील मंदीरे, गुहा, लेणी, शिल्प इत्यादी ची माहिती प्रादेशिक इतिहासात मिळत असल्यामुळे मंदीरातील मूर्तीकला, त्यांचे प्रकार, शिलालेख व त्यांची लिपी, मंदीराचे प्रकार, स्थापत्य शैली इत्यादी संदर्भात बरीच माहिती उपलब्ध होते. उदा. 'चंद्रपूर व गडचिरोली जिल्ह्यातील पुरातत्व' या ग्रंथात रा. र. बोरकर यांनी या प्रदेशातील कला व स्थापत्याची चर्चा केली आहे.[१०]

**(८) आर्थिक परिस्थिती व व्यापार:—**

प्रादेशिक इतिहासलेखनामुळे त्या प्रदेशातील आर्थिक परिस्थितीची माहिती उपलब्ध होते. तिथे चालणारा व्यापार, आयात निर्यात, चलन, वजन मापे, व्यापाऱ्यांची नावे, घेण्यात येणारी पिके व त्याची व्यवस्था, शेती, दळणवळण, रस्ते, रोजगार, बॅंकीग व्यंवस्था, नाणी, उद्योगधंदे, वाणिज्य इत्यादी संदर्भातील माहिती उपलब्ध होऊन त्याद्वारे त्या प्रदेशाची अर्थव्यवस्था कशी होती याचे अनुमान काढता येते.[११]



Scanned with OKEN Scanner

(Local to Global) मानवाच्या सर्वस्पर्शी अंगाची चर्चा इतिहासात अविष्कृत होत आहे. प्रादेशिक इतिहासाच्या माध्यमातूनही अनेक नविन प्रादेशिक इतिहासाची मांडणी व लेखन सुरू असून राष्ट्रीय व वैश्विक इतिहासाला समृध्द करण्यासाठी प्रादेशिक इतिहासाची गरज आहे. प्रादेशिक इतिहासातूनच स्थानिक इतिहासालाही चालना मिळून अनेक नविन संशोधने व माहिती उपलब्ध होत आहे. त्यामुळे स्थानिक नेतृत्व, चळवळी, कला स्थापत्य, स्वातंत्र्य आंदोलने, समस्या इत्यादी वर मोठ्या प्रमाणात माहिती मिळत आहे. तसेच अनेक नविन प्रादेशिक संदर्भ साधने उपलब्ध होऊन त्यामुळे इतिहासात नविन भर पडत आहे.

परंतु या प्रादेशिकतेमुळे संकुचित प्रादेशिकता वादाची भिती निर्माण झाली आहे. प्रादेशिक असमतोलाबाबतचे वाद उफाळून येऊन सीमावादांना आणि प्रादेशिक अस्मितांना संकुचित स्वरूप प्राप्त होऊन विभाजन वादी प्रवृत्ती वाढू लागल्या आहे. तरी आपण प्रादेशिकता विषयीचा आदरभाव जपला व संयमाने विवेकशिलतेन जर आपण लिखान करीत राहिलो तर निश्चितच प्रादेशिक इतिहासाचे अनेक नविन संदर्भ, आविष्कार घडत राहिल यात कुठलीच शंका राहणार नाही.

**संदर्भग्रंथ**

*डॉ. कोठेकर शंता, 'इतिहास तंत्र आणि तत्वज्ञान', श्री साईनाथ प्रकाशन, नागपूर, २००७*

*बाबूरकर जास्वंदी(संपा), 'इतिहासातील नविन प्रवाह', डायमंड पब्लिकेशन, पुणे, २०१४*

*डॉ. सरदेसाई बी. एन, 'इतिहास लेखन पध्दती', फडके प्रकाशन, कोल्हापूर, २०११*

*गायकवाड, डॉ. सरदेसाई, हनमाने, 'इतिहास लेखनशास्त्र', फडके प्रकाशन, कोल्हापूर, २००१*

*पांडे प्रकाशचंद्र 'सार्थक इतिहास बोध', ग्रंथविकास प्रकाशन, जयपूर, २०११*

*ई श्रीधरण, 'इतिहास लेख', ओरीएंट ब्लैक स्वान प्रकाशन, हैदराबाद, २०११*

*Ellwood P. Cubberley, 'Historical Perspectives of Eduction', Dominant Publishers, Delhi 2010*

*K Satish, 'Recent Trends in Histriography', Anmol Publishars, 1998*

*Thapar Romila, 'The Scop and Signigicance of Regional History 'orient longman publishes, New Delhi, 1987*

Assistant Professor
Lokmanya Mahavidyalaya, Warora
Dist. Chandrapur

Scanned with OKEN Scanner